मा. उच्च न्यायलयाच्या आदेशानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१.०१.१९९६ पूर्वीच्या पीएच.डी. अर्हता धारण केली असणाऱ्या अध्यापकीय कर्मचाऱ्यांना पीएच.डी.च्या दोन आगाऊ वेतनवाढी अनुज्ञेय करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांकः न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.४१९/१७/विशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीखः- १३ सप्टेंबर, २०१९

**वाचा :-**

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी-१२९८/(४६१९)/विशि-४, दि.११ डिसेंबर, १९९९.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एनजीसी-१२००//७३३९६/(१५/२०००)/विशि-४, दि.१३ जून, २०००
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र.युएसजी-१२००/(१३३/००)/विशि-४, दि.२० सप्टेंबर, २००१.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्र. १ येथील दि.११ डिसेंबर, १९९९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली. सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१३ जून, २००० च्या शासन निर्णयान्वये विविध मुद्यांबाबत स्पष्टीकरण करण्यात आले. तसेच त्यानंतर संदर्भाधीन क्र.३ येथील दि.२० सप्टेंबर, २००१ येथील पत्रान्वये दि.०१ जानेवारी, १९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण केलेल्या अधिव्याख्यातांना दोन आगाऊ वेतनवाढी दि.२७.०७.१९९८ पासून देण्यात याव्यात असा खुलासा करण्यात आला.

दि.०१ जानेवारी, १९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण करणाऱ्या अध्यापकांना पीएच.डी. च्या आगाऊ दोन वेतनवाढी दि.०१ जानेवारी, १९९६ पासून मिळण्याबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये क्र.१०८४/२००३, क्र.१०४३१/२०१२, क्र.५४४२/२००८, क्र.९६६/२०१६, क्र.१२१२२/२०१६, क्र.६०४३/२०१६ अशा विविध याचिका दाखल झाल्या. सदरहू याचिका व अन्य समान विषयाच्या याचिकांमध्ये वेळोवेळी आलेल्या सुनावण्यात मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्ते यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेश शासन धोरणाविरुध्द असल्याने त्याविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात शासनाकडून विशेष अनुमती याचिका डायरी क्र.१३२७४/२०१५, क्र.१६२७४/२०१८ दाखल करण्यात आल्या. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदरहू विशेष अनुमती याचिका फेटाळून लावलेल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या उक्त आदेशाचे अनुपालन न झाल्यामुळे याचिकाकर्ते यांनी मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र.२०९/२०१७, क्र.३६०/२०१९ दाखल केलेल्या आहेत. या बाबी विचारात घेता उक्त नमूद याचिकांमध्ये मा. उच्च

न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करणे आवश्यक असल्याने दि.०१ जानेवारी, १९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण करणाऱ्या अधिव्याख्यांना पीएच.डी. च्या दोन आगाऊ वेतनवाढी दि.०१ जानेवारी, १९९६ पासनू अनुज्ञेय करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

१. शासन या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

I. शासन निर्णय दि.११ डिसेंबर, १९९९ व दि.२० सप्टेंबर, २००१ च्या पत्रान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ज्या अधिव्याख्यात्यांनी दि.०१ जानेवारी, १९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण केलेली आहे. अशा अधिव्याख्यांत्यांना पीएच.डी. च्या आगाऊ दोन वेतनवाढी दि.२७ जुलै, १९९८ पासून अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. त्याऐवजी या दोन आगाऊ वेतनवाढी दि.०१ जानेवारी, १९९६ पासून अनुज्ञेय करण्यात येत आहेत.

II. यानुसार पात्र ठरणाऱ्या अधिव्याख्यात्यांना देय ठरणाऱ्या रकमेची संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अचूक परिगणना करून दोन आगाऊ वेतनवाढीचे लाभ अदा करण्यात यावेत.

२. यासाठी होणाऱ्या सुमारे रू.५,२४,३८,२२०/- (अक्षरी रूपये पाच कोटी चोवीस लक्ष अडतीस हजार दोनशे वीस फक्त) एवढ्या खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

३. यासाठी होणारा खर्च पुढील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

I. मागणी क्र.डब्ल्यू-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण १०३, शासकीय महाविद्यालये व संस्था (०१) (०१) शासकीय कला महाविद्यालये २२०२ ०७७२

II. मागणी क्र.डब्ल्यू-२, २२०२- सर्वसाधारण शिक्षण १०४-अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य (०१) अशासकीय महाविद्यालयांना सहायय्य (०१) (०१) अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने ३६ सहा. अनुदाने (वेतन) २२०२ ०८७२

III. मागणी क्र.डब्ल्यू-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण १०२- विद्यापीठांना सहाय्य (००) (०१) सर्वसाधारण शिक्षणासाठी विद्यापीठांना अनुदाने ३६ सहा. अनुदाने (वेतन) २२०२ ०६८३

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३०६/२०१९/सेवा-९, दि.०८.०८.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने तसेच मा. मंत्रीमंडळाच्या दि.०९.०९.२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०९१३१७५२२३८६०८ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ekriath Sable

Digitally signed by Vijay Eknath Sable
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ad74ad70b49c8ab0bc83f54f3d9c9157 1a6cd47ae69a9f0576 d44cafe7a7d8e, serialNumber=ad6df0c87ab8e6c9f8574abc38dd4c46eebe8182f143e76b fa02129f6ee62cd2, cn=Vijay Eknath Sable
Date: 2019.09.16 12:12:23 +05'30'

(विजय साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई-१, महाराष्ट्र, (५ प्रती),
५. महालेखापाल (लेखा परीक्षा) मुंबई-१, महाराष्ट्र, (५ प्रती),
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर-२, महाराष्ट्र, (५ प्रती),
७. महालेखापाल (लेखा परीक्षा) नागपूर-२, महाराष्ट्र, (५ प्रती),
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
१०. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१२. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,
१३. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
१४. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
१५. निवड नस्ती (विशि-१).

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd:1962
NAAC 'A'Grade

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE :0231-2609089,2609136 & 2609146**
**शिवाजी विद्यापीठ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर-४१६ ००४. महाराष्ट्र**
**दूरध्वनी-०२३१-२६०९०८९,२६०९१३६ व २६०९१४६**
Website : www.unishivaji.ac.in e-mail : www.affiliationt1@unishivaji.ac.in

**शिवाजी वि./संलग्नता टी.१/ प्रशांत/** 441 **दिनांक** 14 NOV 2019
No 0441 -

**प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये व शिक्षण संस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

आपला विश्वासू,

डॉ. व्ही.डी.नांदवडेकर

कुलसचिव